लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू

# दिव्यांग विद्यार्थ्यांसमवेत रंगले सिटी स्कूलचे विद्यार्थी

पुणे : दिव्यांग मुलांच्या वेदनांची आणि सेवामूल्याची जाण विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी सिटी इंटरनॅशनल स्कूलच्यावतीने दिव्यांग विद्यार्थ्यांसमवेत बालदिन साजरा करण्याचा उपक्रम राबविला. सिटी इंटरनॅशनलच्या सहाव्या इयत्तेतील विद्यार्थ्यांनी गुरुवारी (दि. १४) वानवडी येथील अपंग कल्याणकारी शिक्षण संस्था व संशोधन केंद्राला भेट दिली. विद्यार्थ्यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दिव्यांगांना चॉकलेटचे वाटप केले. संस्थेच्या ग्रंथालयाला पुस्तकेही भेट दिली. तसेच, शिशुगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांसमवेत आयोजिलेला पपेट शो आणि मोठ्या विद्यार्थ्यांना दाखविलेल्या चित्रपटाचा आस्वादही विद्यार्थ्यांनी घेतला. प्राचार्य अर्चना क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला.